**शपथेवर पुढील सरतपास ॲड. श्री वानखडे अर्जदारातर्फे :—**

०५. शपथपत्र **नि.क्र. यु—५** मला दाखविले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर माझे सांगितल्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. कागदपत्र यादी नि. यु—२ सोबत मी माहिती अधिकाराखाली प्राप्त झालेली माझी सेवापुस्तकाची माझी प्रत सादर केलेली आहे. सेवापुस्तकात झालेल्या नोंदी हया नियमित कार्यालयीन क्षमतेमध्ये नोंदविल्या जातात त्यामुळे सदर दस्त हा कार्यालयीन क्षमतेमध्ये महामंडळाने तयार केलेला असल्याने. तसेच माहिती अधिकारातंर्गत सदर प्रत दिलेली असल्याने त्यास **नि. यु—६** देण्यात आली.

**पुढील सरतपास पूर्ण झाला :**

**उलटतपास श्री. भास्कर पाटिल अधिवक्ता गैरअर्जदारातर्फे** :

०६. मी सेवानिवृत्त झाल्यानंतर मला मिळालेले पैसे हे कमी आहेत अशी तक्रार मी गैरअर्जदार महामंडळाकडे केली नव्हती. सन २०१६ च्या कामगार कराराअन्वये मुंबई मुख्य कार्यालयातून सन २०१८ साली परिपत्रक काढण्यात आले होते याची मला माहिती नाही. मी माझे पगारपत्रक सादर केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही

की मी उशीरा अर्ज दिलेला असल्याने व्याज मिळण्यास पात्र नाही.

हे म्हणणे खरे मी खोटा अर्ज दिला व खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण झाला.**

**फेरतपास काही नाही**.

माझे समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वा/—
(अ. दा. तिडके)
न्यायाधीश
कामगार न्यायालय, चंद्रपुर

दि. ०३.०२.२०२६.